# मानक कार्यप्रणाली

अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स यांना प्रतिबंध घालणेबाबत तसेच सदर प्रकरणी मा. न्यायालय अवमान कार्यवाही आणि सरकारचा समावेश असलेली न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत.

उद्देश :- अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स्, पोस्टर्स, बॅनर्स यांना प्रतिबंध घालणेबाबत तसेच सदर प्रकरणी महाराष्ट्र सरकारच्या विरोधात अवमान याचिका अंतर्गत कार्यवाही हाताळण्यासाठी मानक कार्यप्रणाली प्रदान (SOP)करणे.

व्याप्ती :- सदर मानक कार्यप्रणाली (SOP) सातारा नगरपरिषद, सातारा क्षेत्रामध्ये होर्डिंग, फ्लेक्स्, पोस्टर्स, बॅनर्स अधिकृतपणे उभे करणे बाबत नियम प्रस्तावित करते व अनधिकृत उभारण्यात येणा-या अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स्, पोस्टर्स, बॅनर्स इ. वर कायदेशीर व दंडात्मक कार्यवाहीसाठी करण्यात येणा-या उपाययोजना निर्धारित करते.

उद्दिष्ट :- 1. अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स मुळे होणारे शहर विद्रुपीकरण रोखणे
2. धोकादायक होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स मुळे होणारे अपघात टाळणे व जीवितहानी रोखणे
3. शासन, मा. न्यायालय व वरिष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे/आदेशांचे/नियमावलीचे अंमलबजावणी करणे.

कार्यवाही :-

1. परवानगी देण्याची प्रक्रिया व कार्यपध्दती :-
   अ) सातारा नगरपरिषद क्षेत्रामध्ये होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स उभारणीसाठी www.sataranp.in आणि Play Store वरुन मोबाईल मध्ये My Satara App Download करुन परवानगी घ्यावी.
   आ) सातारा नगरपरिषदेमार्फत अर्जदार यांनी सातारा शहर पोलीस स्टेशन व सातारा शाहुपुरी पोलीस स्टेशन यांचा नाहरकत दाखला आणि होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स याचे छायाचित्र upload केल्याचे छाननी/पडताळणी झालेनंतर फलक उभारणेस परवाना देण्यात येते.
   इ) अर्जदार यांनी निर्धारित शुल्क् भरणा केलेनंतर अर्जदारास यांना QR कोडसह परवाना देण्यात येतो. त्यामध्ये फ्लेक्स बोर्ड, होर्डिंग, बॅनर्स, पोस्टर्स इ. उभारण्याची संपुर्ण माहिती नमुद असते. ज्या जाहिरात फलकावर QR कोड आढळत नाही ते तात्काळ निष्कासित करण्यात येतो. QR देऊन होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स इ. वर लावणे बंधनकारक केले जाते.
2. जागा निश्चिती :-

   वाहतुक व रहदारीस अडथळा होणार नाही याची खबरदारी घेऊन तात्पुरत्या स्वरुपात लावणेत येणाऱ्या जाहिरात बोर्डची जागा निश्चिती करण्यात आली आहे. त्यासंबंधी प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे.

3. जाहिरात शुल्क व भाडे आकारणी :-

तात्पुरत्या स्वरुपात लावणेत येणा-या जाहिरात बोर्डकरिता आकारण्यात येणा-या जाहिरात शुल्क व जागा भाडे आकारणीस सातारा नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. 835 दि. 26/06/2006 ने नुसार निर्धारित करण्यात आला आहे.

4. तक्रार निवारण यंत्रणा :-

सातारा नगरपरिषदेमार्फत शहरात अनधिकृत बोर्ड उभारणेत आलेचे निदर्शनास आलेस त्या संबंधीची तक्रार करणेस कार्यालयीन दुरध्वनी तक्रार निवारण नं. व What's App 7030409090, टोल फ्री 18005703040 उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

5. प्रसिध्दीसाठी करावयाच्या उपाययोजना :-

अनधिकृत जाहिरात बोर्ड लावलेमुळे शहराचे होणारे विद्रुपीकरण रोखण्यासाठी सातारा नगरपरिषदेने निश्चित केलेल्या जागांमध्येच बोर्ड उभारणीबाबत वर्तमानपत्राद्वारे व सोशल मिडिया वर शहरात जनजागृती केली आहे.

6. नागरिकांची समिती :-

सातारा शहरातील अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स संदर्भात सुचना, तक्रार निवारण करणेकामी नागरिकांची समिती स्थापन करण्यात आली असून सदर समिती मा. उच्च् न्यायालय मुंबई जनहित याचिका क्र. 155/2011 संबंधित पारित केलेल्या आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत असलेबाबतची खात्री करत आहे.

7. निष्कासन कार्यवाही पध्दती :-

सातारा शहरामध्ये अनधिकृत उभारण्यात आलेल्या होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स इ. तपासणीकरिता आवश्यकतेनुसार शोध मोहिम राबवण्यिात येऊन त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल तसचे अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स इ. मध्ये मोठया प्रमाणावर प्लास्टिक किंवा इतर अविघटनशील पदार्थांचा वापर केला जात असल्याने निष्कासन कारवाईत सातत्य् ठेवण्यात येते.

8. नोडल अधिकारी व वार्ड अधिकारी जबाबदारी :-

मा. मुख्याधिकारी कार्यालयीन आदेशान्वये नोडल अधिकारी व वॉर्ड अधिकारी यांची नियुक्ती करुन खालीलप्रमाणे जबाबदारी निश्चित करतील.

अ) मा. उच्च् न्यायालय दि. 31.01.2017 रोजी व इतर दिलेल्या आदेशांचे उल्लंघन होणार नाही याची विशेष दक्षता घेणे व वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे.

आ) सातारा शहरात होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स इ. उभारणीसाठी निश्चित केलेल्या जागीच परवानगी देण्यात येईल याची विशेष खबरदारी घेणेत येते.

इ) सातारा शहरात होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स इ. उभारलेनंतर त्यावरी QR कोड असल्याची खात्री करुन परवानगी दिलेल्या जागीच बोर्ड उभारला आहे का याची खात्री केली जाते.

ई) सातारा शहरात होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स इ. उभारणीमुळे वाहतुकीस, रहदारीस किंवा कोणता अपघात होणार नाही याची खबरदारी घेतली जाते.

उ) सर्व राजकीय पक्ष तसेच नागरिकांशी योग्य समन्वय साधुन कोणत्याही प्रकारची दुर्घटना, शहराचे विद्रुपीकरण होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सातारा नगर परिषद
अतिक्रमण विभाग
सातारा